# कार्यकारी अभियंता,
## प्रशासन संगणकीकरण विभाग, पुणे
जलसंपत्ती भवन, कर्वे पुतळ्याजवळ, कोथरुड, पुणे- ४११ ०३८
दुरध्वनी: ०२०-२५४६८९८२, फॅक्स: ०२०-२५४४५७६३
ई-मेल: eecm.pmo@wrd.maharashtra.gov.in
*जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळास कृपया भेट द्या : http://wrd.maharashtra.gov.in*

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग


**(फक्त ई-मेल द्वारे)** जा.क्र.: प्रसंवि/तां-१/ईसेपु/०७/फाईल क्र.१५४/२०१६ दिनांक:- १०/०५/२०१६

प्रति,

**मा. महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक**
**मा. महासंचालक, जल व भुमी व्यवस्थापन संस्था, औरंगाबाद**
**मा. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे**
**मा. कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा सिंचन विकास महामंडळ, औरंगाबाद**
**मा. कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपुर**
**मा. कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे**
**मा. सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग**
**मा. सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग**

| | |
|---|---|
| विषय:- | **ई-सेवा पुस्तक प्रणालीमधील प्रशिक्षण (Training Details) मोडयुल माहिती भरण्याकरिता उपलब्ध करुन देणे बाबत.** |
| संदर्भ: | १. जलसंपदा विभाग शासन निर्णय प्रशा २०१४/(२५१/१४)/ल.पा.-१ दि. ११.११.२०१४<br>२. जलसंपदा विभाग पत्र क्रमांक ई-प्रशा २०१४-(२५१/१४)/ल.पा.-१ दि. २५.०३.२०१५<br>३. अधीक्षक अभियंता, कोयना संकल्पचित्र मंडळ या कार्यालयाचे पत्र पीएमओ/D-४/धा-१५४/१४५२/२०१५/दि. ३१.०७.२०१५<br>४. जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. संकिर्ण-२०१५/(१३/२०१५)/संकाक, दि. १३/०७/२०१५ |

उपरोक्त संदर्भ क्र. १ अन्वये जलसंपदा विभागातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे करिता ई-सेवा पुस्तक ही प्रणाली अनिवार्य करण्यात आली आहे. संदर्भ क्रमांक २ व ३ अन्वये ई-सेवा पुस्तक प्रणालीमधील पहिले आठ मोडयुल्स माहिती भरण्याकरिता उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. विभागातील अधिकारी/कर्मचारी यांनी सदर मोडयुल्स मध्ये त्यांची वैयक्तिक माहिती चांगल्या प्रकारे भरलेली आहे. यानिमित्ताने संबंधितांचे अभिनंदन करण्यात येत आहे. **आता ई-सेवा पुस्तक प्रणालीमधिल "Training Details" हे महत्त्वाचे मोडयुल माहिती भरण्याकरिता सर्वांना उपलब्ध करुन देण्यात येत आहे.**

जलसंपदा विभाग आपल्या अधिकारी/कर्मचारी यांना दर्जेदार प्रशिक्षण उपलब्ध करुन देण्याबाबत सातत्याने प्रयत्नशिल राहिलेला आहे. जलसंपदा विभागाने कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना त्यांच्या कार्यक्षेत्राप्रमाणे, अनुभवाप्रमाणे व राज्य प्रशिक्षण धोरणानुसार कौशल्याधारित उत्तम प्रशिक्षण देण्यासाठी संदर्भ क्र. ४ च्या अनुषंगाने "e-Training Information Management and Evaluation (eTIMES) **[ई-प्रशिक्षण माहिती व्यवस्थापन व मुल्यमापन प्रणाली" (ई-टाईम्स)] ही प्रणाली** विकसीत केलेली आहे. सदर प्रणाली महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक, जल व भुमी व्यवस्थापन संस्था, औरंगाबाद तसेच प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र,

पुणे, औरंगाबाद व नागपुर यांचेसाठी विकसित करण्यात आली आहे. सदर प्रणाली जलसंपदा विभागाच्या ई-सेवा पुस्तक प्रणालीबरोबर ऑनलाईन पध्दतीने जोडण्यात आलेली आहे. या दोन्ही प्रणालींद्वारे वार्षिक प्रशिक्षण कार्यक्रमांची माहिती सर्व अधिकारी / कर्मचारी यांचेपर्यंत पोहचविणे, त्यांचेकडुन प्रशिक्षणासाठी ऑनलाईन नामांकने मागविणे, प्रशिक्षणार्थीची निवड करुन त्यांना त्याबाबत कळविणे, प्रशिक्षण कार्यक्रमाची आखणी करणे, प्रशिक्षण संपल्यानंतर प्रमाणपत्र देणे, घेतलेल्या प्रशिक्षणाची नोंद ऑनलाईन पध्दतीने ई-सेवा पुस्तकात घेणे, गैरहजर राहणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांचेबाबत penalty letter देणे इ. कार्यवाही या प्रणालीमार्फत पार पाडण्यात येणार आहे.

उपरोक्त नुसार कार्यवाही पार पाडण्यासाठी ई-सेवा पुस्तक प्रणालीमधील भरलेल्या माहितीचा वापर होणार आहे. उदा. अधिकारी/कर्मचारी यांनी शासन सेवेत रुजु झाल्यापासुन आजतागायत घेतलेल्या प्रशिक्षणाच्या माहितीचा वापर करुन त्यांचे विशिष्ट प्रशिक्षण कार्यक्रमासाठी निवड करणे. विशेषत: ई-सेवा पुस्तक प्रणालीमधील "Training Details" या मोडयुल मध्ये भरलेल्या माहितीचा उपयोग सन २०१६-१७ वर्षाकरिताच्या प्रशिक्षणार्थीच्या निवडीकरीता जलसंपदा विभागाच्या प्रशिक्षण संस्थाद्वारे करण्यात येणार आहे.

**तरी आपणास विनंती करण्यात येते की आपल्या अधिनस्त कार्यरत सर्व अधिकारी/कर्मचारी यांना ते शासन सेवेत रुजु झाल्यापासुन आजतागायत घेतलेल्या प्रशिक्षणाच्या प्रशिक्षणविषयीची सर्व माहिती ई-सेवा पुस्तक प्रणालीच्या "Training Details" या मोडयुल मध्ये भरण्याबातच्या सुचना आपल्या द्याव्यात.** जेणेकरुन ई-टाईम्स प्रणालीद्वारे प्रशिक्षणार्थिंची निवड प्रक्रिया चांगल्याप्रकारे राबविता येईल व जलसंपदा विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील गरजेप्रमाणे उत्तम प्रशिक्षण मेटा, नाशिक, वाल्मी, औरंगाबाद व प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र या प्रशिक्षण संस्थांना देता यईल.

**श्री. प्रविण कोल्हे,**
कार्यकारी अभियंता,
प्रशासन संगणकीकरण विभाग, पुणे

**टीप:** "Training Details" मोडयुल या मध्ये माहिती कशी भरावी याबाबतचे युजर मॅन्युअल जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळावरील ई-सेवा पुस्तक या वेब पेज वरती उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

**प्रतिलिपी:-**

प्रत: - मा. सचिव (जसंव्य व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर (लक्षवेध:श्री. अतुल कोदे, सहसचिव (सेवा))

प्रत: - मुख्य अभियंता, (जसं), जलसंपदा विभाग, पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर

प्रत: - अधीक्षक अभियंता, जलसंपदा ई-प्रशासन मंडळ, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत: - मा. अधीक्षक अभियंता व सहसंचालक, जल व भुमी व्यवस्थापन संस्था, औरंगाबाद यांना माहितीस्तव माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव सविनय सादर.

प्रत: - मा. अधीक्षक अभियंता व सहसंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक यांना माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव सविनय सादर.

प्रत: - सर्व कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग यांना माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी समादराने अग्रेषित.